**<u>ठाणे महानगरपालिका,ठाणे.</u>**

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :१८/०५/२००९

**ठाणे महानगरपालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेची सूचना**
**सभा सूचना क्रमांक १, दिनांक १८/०५/२००९**

**प्रति,**
**सन्मा. श्री / श्रीमती -----------------------------**
सदस्य/सदस्या,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, ठाणे महानगरपालिकेची **विशेष सर्वसाधारण सभा बुधवार दि.०३/०६/२००९ रोजी सकाळी ११.३० वाजता** ठाणे महानगरपालिकेच्या **"भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात"** सभा सूचना क्रमांक १, दिनांक १८/०५/२००९ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे.

तरी सदर सभेस आपण कृपया उपस्थित रहावे, ही विनंती.

**<u>मा.महापौर महोदया यांचे मंजुरीने .. .. ..</u>**

**( प्र. म. निंबर्गी )**
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**<u>सभा सूचना क्रमांक १, दिनांक १८/०५/२००९ ची विषयपत्रिका</u>**

| **प्रकरण क्रमांक** | **विषय** |
|---|---|
| १. | **ठाणे महानगरपालिकेच्या सन २००८-२००९ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २००९-२०१० चे मूळ अंदाजपत्रकास तसेच ठाणे महानगरपालिकेच्या मा.शिक्षण मंडळ व मा.परिवहन उपक्रमाचे सन २००८-२००९ चे सुधारित व सन २००९-२०१० चे मूळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत मा.स्थायी समितीची शिफारस.** |

महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक :१८/०५/२००९

**( प्र. म. निंबर्गी )**
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

सोबत :-
१) परिवहन सेवा ठाणे महानगरपालिका अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक पुस्तिका.
२) ठाणे महानगरपालिका शिक्षण मंडळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक पुस्तिका.
३) महाराष्ट्र राज्य शासनाचे दि.२८ फेब्रुवारी २००८ चे राजपत्र.
४) महाराष्ट्र राज्य शासनाचे दि.२६ डिसेंबर २००७ चे राजपत्र.
५) महाराष्ट्र राज्य शासनाचे दि.६ फेब्रुवारी २००९ चे राजपत्र.
६) महाराष्ट्र राज्य शासनाचे दि.१४ जानेवारी २००९ चे राजपत्र. सन्मा.सदस्यांचे माहितीसाठी.

**टिप :-** ठाणे महानगरपालिका अर्थसंकल्प सन २००९-२०१० पुस्तिका बॅगसह दि.२३/०३/२००९ रोजी सन्मा.सदस्यांचे निवासस्थानी पाठविण्यात आलेली आहे.